# प्रकरण चौथे

# बॅ. महंमद अली जीना यांचे फाळणीसंबंधी विचार

# प्रकरण ४

# बॅ. महंमद अली जीना यांचे फाळणीसंबंधीचे विचार

बॅ. महंमद अली जीना यांचा जन्म अल्पसंख्य अशा एका खोजा मुस्लिम कुटूंबात कराची येथे झाला. खोजा हा पंथ म्हटले तर इस्लामी होता. पण मूळचा हिंदू धर्माशी या पंथाची नाळ जोडलेली होती. शिया पंथीय मुसलमानांनी खोजा पंथाला आपल्याजवळ घेतले असले तरी १७ व्या व १८ व्या शतकात अनेकदा खोजा पंथीयांनी मूळच्या हिंदू समाजामध्ये परतण्याचे प्रयत्न केले होते. कर्मठ हिंदूंनी त्या भ्रष्ट लोकांना परत आपल्यात घेण्यास नकार दिला. तरीदेखील खोजा मुसलमानांनी विशेषतः इस्मायली खोजांनी ताकिया मार्गाचा अवलंब करुन जुन्या प्रथा परंपरेशी आपले नाते कायम राखले होते. हिंदू आणि इस्लाम या दोन वेगवेगळया धर्माचे आगळेवेगळे मिश्रण म्हणून खोजा पंथ तयार झाला.(१)

महमंद अली जीना यांच्या वडिलांचे नाव जिनाभाई व आईचे नाव मीठीबाई हे होते. जिनाभाई यांचा व्यवसाय सावकारकीचा होता. जीनाभाई व मीठीबाई यांचे पहिले अपत्य महमंद अली जीना हे होते. जीनांना चार बहिणी, फतिमा, मरियम शिरीन व रहमत आणि दोन भाऊ अहमद अली व बंदे अली ही भावंडे होती.(२)

बॅ. महंमद अली जीना घरातील सर्वाचे लाडके होते. जीनांचे प्राथमिक शिक्षण कराची येथे झाले. लहानपणापासूनच जीनांना अभ्यासात गोडी होती. जीनाभाईची एकुलती एक बहीण मानबाई मुंबईला राहात असे. पीरभाई नावाच्या एका श्रीमंत खोजा तरुणाशी तिचे लग्न झाले होते. महंमद शाळेत हुशार होता, त्याला चांगले शिक्षण मिळाले तर त्याच्यासारखा हुशार, चुणचुणीत मुलगा निश्चित नाव मिळविल असे त्यांच्या आत्या मानबाई यांना वाटत होते. म्हणून महंमदला त्यांनी मुंबई येथे शिक्षणासाठी नेले.(३)

महंमद अली जीनाचे पुढील सर्व शिक्षण मुंबईमध्येच झाले. महंमद अली यांना व्यापाराशी निगडित सर्व कायदेकानून याची माहिती व्हावी म्हणून जीनाभाईंनी महंमद अलींना इंग्लंडला पाठविण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडला जाण्यापूर्वी महंमद अलीचा विवाह व्हावा अशी त्याची आई मीठीबाई यांना वाटत होते. म्हणून महमंदचा पहिला विवाह पनेली गावातीलच एमीबाई नावाची १४ वर्षाच्या मुलीबरोबर झाला.

महमंद अली जीना इंग्लंडला गेले. त्यांनी लंडनमधील लिंकन्स इन या नावाने प्रसिध्द असलेल्या कायदा प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेतला. १८९५ मध्ये महमंद अलीना बॅरिस्टर ही पदवी मिळाली व ते इंग्लंडहून कराची येथे परत आले. महंमद अलीना आपल्या वकिली व्यवसायासाठी मुंबई हे ठिकाण योग्य वाटत होते. म्हणून त्यांनी कराची सोडून वकिली व्यवसायासाठी मुंबई येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.

महमंद अली जीनांनी मुंबई उच्च न्यायालयात दि. २४ ऑगस्ट १८९६ रोजी बॅरिस्टर म्हणून नाव नोंदविले. त्यावेळी तशी नाव नोंदणी करणारे ते एकमेव मुस्लिम बॅरिस्टर होते.(४)

इंग्लंडला असताना महंमद अली जीनांवर दादाभाई नौरोजी यांची छाप पडली होती. लंडनमधील इंडियन सोसायटी नावाची संस्था त्या देशातील लोकमत भारताला अनुकुल बनविण्यासाठी प्रयत्नशील होती. १८८५ पासून लंडन आणि लिव्हरपूल येथे उद्योगव्यवसायाला प्रारंभ करणारे दादाभाई नौरोजी हे पारसी गृहस्थ त्या सोसायटीचे संस्थापक होते. अखिल भारतीय कॉंग्रेसच्या १८८६ सालच्या म्हणजे स्थापनेनंतरच्या वर्षीच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद दादाभाई नौरोजी यांनी भूषविले होते. भारतीय जनतेचे प्रश्न ब्रिटीश मतदारासमोर मांडून त्यांचे मत आपल्या बाजूला वळवून घेतल्याशिवाय आपले प्रश्न कधीच धसाला लागणार नाहीत. मग ते सुटण्याची गोष्टच दूर राहिल असे सुस्पष्ट प्रतिपादन त्यांनी भारतात अनेक ठिकाणी केले होते. १८९२ साली ब्रिटीश पार्लमेंट निवडणूकीत त्यांनी सेंट्रल फिन्सबरी या मतदार संघातून

लिबरल पक्षातर्फे उमेदवारीही मिळविली. ते या निवडणूकीत निवडून आले होते. त्यावेळी त्यांचे वय ६७ वर्षांचे होते. (५)

दादाभाई नौरोजी हे इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे पितामह म्हणून ओळखले जात होते. बॅ. महंमद अली जीना दादाभाईंच्या व्यक्तिमत्वाने इंग्लंडमध्ये असताना भारावून गेले होते. ज्या ब्रिटीश उदारमतवादाचा लाभ घेऊन दादाभाई नौरोजींसारखे वयोवृध्द भारतीय नेते आपल्या देशाची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करीत होते. त्याची माहिती मिळविण्याचे काम जीनांनी इंग्लंडमध्ये असताना केले होते. ग्लॅडस्टन याचे मंत्रिमंडळातील एक सहकारी जॉन मोर्ले हे उदारमतवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते म्हणून त्यावेळी गाजत होते. राजकारणात विविध मूल्यांचा विचार करताना सत्याला सर्वाधिक हा विचार ठामपणे मांडणारे 'On Compromise' हे पुस्तक त्या उदारमतवादाचा प्रसार करण्याचे काम अत्यंत प्रभावीपणे पार पाडत होते. महंमद अलीने ते पुस्तक एकदा वाचून काढले. तेवढयाने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी ते वारंवार वाचून आत्मसात केले.(६)

महंमद अली जीनांना ब्रिटीश म्युझियमच्या वाचनालयात बसून विविध वृत्तपत्रे वाचणे, पुस्तके चाळणे यांची आवड होती. हाइडपार्कम्धील मार्बल आर्कच्या कोपऱ्यावरील मंचावरती होणाऱ्या व्याख्यानाला ही त्यची आवर्जुन उपस्थिती असे.

महंमद अली जीना इंग्लंडहून परतले त्यावेळी बॅ. एम्. ए. जीना असे नामकरण त्यांनी केले होते. कराचीमध्ये त्यांची बॅरिस्टरी कितीही वाढली तरी मर्यादितच राहणार होती. त्यांच्या महत्त्वाकांक्षी मनाला ती कुंपणे घालून घेणे आवडण्यासारखे नव्हते. शिवाय दादाभाई नौरोजींच्या भाषणामुळे राजकीय क्षेत्राबद्दल जे आकर्षण त्यांच्या मनात निर्माण झाले होते. ते सुध्दा त्याला कराचीमध्येच राहण्यापासून परावृत्त करीत होते. बॅ. महंमद अली जीनांनी वकिली व्यवसाय करण्यासाठी मुंबई सारख्या महानगरीत बस्तान बसविले. बॅ. एम्. ए. जीना हुशार होते. त्यांनी आपल्या हुशारीने वकिल क्षेत्रात आपली

नवीनच ओळख करुन दिली. त्यांची राहणी पाश्चिमात्य पध्दतीची होती. इंग्रजी ही जणू त्यांची मातृभाषाच होते. वकिली व्यवसायात त्यांनी अव्वल दर्जाचे वकिल म्हणून ख्याती मिळविली.

बॅ. जीना अशा एका तिठयावर उभे होते. राजकीय क्षेत्रात त्यांना यावयाचे होते पण समोर तीन मार्ग होते. एक काँग्रेसमधील मवाळ गटाचा, दुसरा मार्ग काँग्रेसमधीलच जहाल गटाचा तर तिसरा मार्ग मुसलमान समाजाचे प्रतिनिधीत्व करीत ब्रिटीशांशी राजनिष्ठा राखण्याचा सर सईद अहमद खानचा मार्ग होता. मुसलमान तरुणाला जातीय एकता, भूतकालीन गौरव, धार्मिक कट्टरपण यांच्या आधारावर संघटित करण्याचे कार्य सर सय्यद अहमद यांनी केले. त्यांनी १८७७ मध्ये उत्तर प्रदेशात अलिगढ येथे मुस्लिम ओरियंटल कॉलेजची स्थापना केली. इंग्लंडचा तत्कालीन पंतप्रधान लॉर्ड नॉर्थ ब्रुक यांनी या मुस्लिम विद्यालयाच्या स्थापनेसाठी १० हजार रुपयांची देणगी दिली होती. अलिगढ विद्यापीठाचा उद्देश ब्रिटीश साम्राज्याशी सदैव निष्ठावंत राहणारा मुस्लिम तरुण यातून निर्माण व्हावा हाच होता. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे व दादाभाई नौरोजींच्या सहवासात असल्यामुळे जीनांना मुस्लिमांचे नेते व्हावे असे वाटत नव्हते. बॅ. जीनांना राजकीय क्षेत्रात येण्यासाठी तिसरा मार्ग मनापासून नकोसा वाटत होता. ते जन्माने मुसलमान होते पण ती बाब राजकीय भांडवल म्हणून वापरावी व आपण अल्पसंख्य असल्याचा न्यूनगंड बाळगावा असे त्यांना वाटत नव्हते. जीनांचा राजकारणातील सहभाग दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले या काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांच्या बरोबर झाला. डिसेंबर १९०४ मध्ये मुंबईच्या ओव्हल मैदानावर इंडियन नॅशनल काँग्रेसचे जे अधिवेशन भरले होते, त्याचे स्वागताध्यक्ष फिरोजशहा मेहता होते. त्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीपासून बॅ. जीनांचा या संघटनेशी संबंध जोडले गेले. (७)

लॉर्ड जार्ज नाथातील कर्झन नावाच्या ब्रिटीश व्हाईसरॉयनी १९ जुलै १९०५ रोजी बंगाल प्रांताची फाळणी करण्याची आणि मुसलमानांची बहुसंख्य

असणाऱ्या पूर्व बंगलाचा वेगळा प्रांत स्थापन करण्याची घोषणा केली. ब्रिटीशांच्या भारतविषयक कुटील नीतीची सुस्पष्ट झलक दाखविणारी वंगभंगांची योजना त्याने जाहीर केली. मात्र बंगालचे नव्हे तर सारा देश खवळून उठला. ज्या मुसलमान समाजाला हाताशी धरुन लॉर्ड कर्झनने वंगभंगांचे कारस्थान रचले होते त्या समाजाने ही त्यांची ती योजना फेटाळून लावली होती. मोहम्मदन लिटररी सोसायटीने कर्झन यांच्या योजनेचे स्वागत केले होते. पूर्व बंगालमधील विविध जिल्हयातील स्थानिक मुसलमान नेत्यांनी अडाणी मुसलमानांची समजूत घालावी आणि वंगभंगाविरुध्द मत व्यक्त करु नये. यासाठी त्यांचे मन वळवावे, असे त्या सोसायटीने आवाहनही केले होते पण त्याचा म्हणावा तसा प्रभाव पडला नाही.

सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी तयार केलेल्या अहवालानुसार वंगभंगाचा प्रस्ताविक योजनेच्या विरोधात संपूर्ण बंगालमध्ये ज्या एकूण २५९ मिरवणुका निघाल्या होत्या, त्यापैकी १३५ मिरवणुका हिंदू-मुसलमान सहकार्यातूनच निघाल्या होत्या. कोलकत्ता, डाक्का, फरीदपूर, मेमनसिंग यासारख्या ठिकाणी ज्या निषेधसभा आयोजित करण्यात आल्या होत्या, त्याचे अध्यक्षस्थान बंगाली मुसलमान नेत्यांनीच भूषविले होते. डाक्याचे नवाब सर सलीमउल्ला यांनीही कर्झन यांच्या योजनेला जाहीर विरोध केला होता. बंगाल फाळणीची कर्झनची योजना तीची बंगालमध्ये आणि देशाच्या अन्यत्र भागात उमटलेली तीव्र प्रतिक्रिया, काँग्रेसच्या जहाल गटाने ब्रिटीश साम्राज्याविरुध्द घेतलेला आक्रमक पवित्रा या सर्वांचे निरीक्षण करणारे बॅ. जीना हालचालींवरही सुक्ष्म नजर ठेवून होते.(८)

१९०५ सालचा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना खुद्द नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी बंगाल प्रांताची फाळणी करण्याच्या कर्झनशाही धोरणावर तर टीका केली होतीच. पण ब्रिटीश राजवटीबद्दलच्या अपेक्षा बदलल्याचेही सूचित केले होते. १९०६ मध्ये डिसेंबर महिन्यात कोलकत्ता येथे काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पितामह दादाभाई नौरोजी होते. वयाची ऐंशी गाठलेल्या त्या आदरणीय नेत्याला अध्यक्षपदाची जबाबदारी नीट पेलता यावी

म्हणून एका स्वीय सचिवाची गरज होती. बॅ. महमद अली जीना यांनी स्वीय सचिवाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली. त्यावेळी १९०६ मध्ये डाक्का येथे अखिल भारतीय मुस्लिम लीगची स्थापना झाली होती. त्याच सुमारास बॅ. जीना कलकत्यामधील इंडियन नॅशनल काँग्रेसच्या बाविसाव्या वार्षिक अधिवेशानात अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांचे स्वीय सचिव म्हणून वावरत होते. दादाभाईंचे विचार समजावून घ्यायचे आणि त्यांचे मुद्देसूद शब्दांकन करुन अध्यक्षीय भाषणाचा मसुदा तयार करण्याचे काम त्यांनी कौशल्याने पूर्ण केले.(९)

## मुस्लीम लीगची स्थापना -

ऑक्टोबर १९०६ मध्ये मुस्लीम शिष्टमंडळ सिमला येथे गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटा यांना भेटले. मुसलमानांना जास्त हक्क मिळवून देण्यासाठी व्यापक स्वरुपाची संघटना असावी असे मुस्लीम नेत्यांना वाटत होते. या शिष्टमंडळाचे नेतृत्व सर सय्यद आगाखान यांनी केले. या मुस्लीम संघटनेची उद्दिष्टये पुढील प्रमाणे होती.

१) भारतीय मुसलमानांमध्ये इंग्रज सरकारप्रति राजनिष्ठेची भावना वृध्दिंगत करणे आणि सरकारच्या काही कार्याबाबत गैरसमजूत झाल्यास ती दूर करणे.

२) भारतीय मुसलमानाच्या राजकीय व इतर हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या आकांक्षा व गरजा स्वयंपूर्ण शब्दांत सरकारसमोर ठेवणे.

३) वरील १ व २ मध्ये दिलेले उद्देश समोर ठेवून मुसलमान व भारतीय जाती-जमातीमध्ये सद्भावना निर्माण करणे.

वरीलप्रमाणे उद्दिष्टये ठरवून १९०६ च्या डिसेंबरमध्ये ढाक्का येथे ऑल इंडिया मुस्लिम लीगची स्थापना झाली. मुस्लीम लीगच्या स्थापनेपासून भारतीय राजकारणाला एक वेगळे, अनिष्ठ वळण लागले. प्रथम लीग ही इंग्रजनिष्ठ संघटना होती. परंतु या संघटनेने नंतर जातीय स्वरुप धारण केल्याचे दिसून येते.(१०)

मुस्लीम लीग संघटना इंग्रजांच्या पाठबळामुळे जास्तच फोफावत गेली. तिच्या विभक्त, अरेरावी आणि हिंदूविरोधी धोरणामुळे भारतची फाळणी होण्यास एक कारण बनल्याचे लक्षात येते.

बॅ. जीना हे प्रारंभी निष्ठावान राष्ट्रवादी होते. आपल्या राष्ट्रवादी निष्ठेला धक्का लागेल असे काहीही करायला ते तयार नव्हते. १९०९ साली केंद्रीय कायदेमंडळात निवडून गेल्यावर त्यांनी विभक्त मतदारसंघाला विरोध करुन मुस्लीम लीगचा रोष पत्करला. परंतु १९११ साली मुसलमान कुटुंब प्रमुखाला आपल्या संपत्तीचा खाजगी विश्वस्तनिधी उभारण्यात मान्यता देणारे त्यांनी विधेयक संमत केले. जीना राष्ट्रीय विधिमंडळात आणि बाहेरीही नामदार गोखले यांच्या सतत संपर्कात होते. १६ मार्च १९११ रोजी नामदार गोखले यांनी विधिमंडळात एक मूलभूत महत्त्वाचे विधेयक सादर केले. सार्वत्रिक शिक्षणाची तरतूद करावी अशी ब्रिटीश सरकारला विनंती करणारे ते विधेयक होते. त्यांना पाठिंबा देणाऱ्यांमध्ये सर्वात पुढे बॅ. महंमद अली जीना होते.

३१ डिसेंबर १९११ रोजी मुस्लीम लीगच्या बांकीपूर येथील अधिवेशनात त्या संघटनेचे सभासद नसणाऱ्या जीनांनी त्या संघटनेचे सचिव बनलेल्या सईद वझीर हसन यांच्या मताचे समर्थन करणारे भाषण दिले आणि कोणीही कोणताही आक्षेप न घेता त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. स्वराज्य हे आपले ध्येय असले पाहिजे हे त्या संघटनेच्या व्यासपीठावरुन त्यांनी प्रथमचच सांगितले होते.(११)

बॅ. महंमद अली जीना यांनी मुस्लीम लीगचे सदस्यत्व स्वीकारावे म्हणून मुस्लीम लीगचे दोन प्रमुख कार्यकर्ते सईद वझीर हसन आणि मौलाना महंमद अली यांनी भेट घेतली. मुस्लीम लीगची ध्येय धोरणे कॉंग्रेसपेक्षा वेगळी होती. त्या ध्येयधोरणात बदल केला तरच मी मुस्लीम लीगचे सदस्यत्व स्वीकारेन अशी प्रथमच अट घालून दि. १० ऑक्टोबर १९१३ रोजी बॅ. जीनांनी मुस्लीम लीगचे सदस्यत्व स्वीकारले होते. इतर जमातींशी सहकार्य करुन क्रमश: जातीय सुधारणा करणे आणि शेवटी देशाला अनुरूप असे स्वराज्य प्राप्त करुन

घेणे हे लीगचे नवे उद्दिष्ट झाले. जीनांच्या खटपटीमुळे कॉंग्रेस व लीग यांची अधिवेशने बरोबर होऊ लागली होती. १९१६ साली लखनौ करार झाला. काही काळ जीना होमरुल चळवळीतही होते आणि ॲनी बेझंट यांना अटक झाल्यावर त्यांना होमरुल लीगचे अध्यक्षपद देण्यात आले. (१२)

१९१६ साली एप्रिल महिन्यात बॅ. जीनांना मोतीलाल नेहरुंनी मुद्दाम अलाहाबाद येथे बोलावून घेतले. इंपिरियल कौन्सिलमधील एक सहकारी, कॉंग्रेस संघटनेतील एक प्रभावशाली नेते, संयुक्त प्रांतामध्ये मोठया नावारुपाला आलेले श्रीमंत बॅरिस्टर म्हणून जिना मोतीलालजींना ओळखत होते. मुंबई अधिवेशनातील निर्णयांच्या अनुषंगाने कॉंग्रेसच्या काही प्रमुख नेत्यांची चर्चा घडवून आणावी असा मोतीलालजींचा इरादा होता. त्या चर्चेच्या वेळी मुस्लीम लीगचे प्रतिनिधी या नात्याने जर जिना उपस्थित राहिले तर चर्चा योग्य दिशेने पुढे सरकेल असे त्यांना वाटले असावे. जीनांनी त्यांचे ते आग्रहाचे आमंत्रण स्वीकारले आणि ते अलाहाबादला गेले. तेथेही त्यांची हिंदू मुसलमान ऐक्याचे पुरस्कर्ते म्हणून मोतीलालजींनी सर्वांशी ओळख करुन दिली. इतर अनेक मुसलमानांपेक्षा हे खूप वेगळे आहेत... आपल्यापैकी प्रत्येक जण जसा राष्ट्रीय वृत्तीचा आहे तसेच हे ही आहेत. ते मुसलमान समाजाला हिंदू समाजाबरोबर बंधुभावाने वागण्याची दीक्षा देत आहेत, असे मोतालालजी म्हणाले.(१३)

जीना प्रारंभी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते हे एका उदाहरणावरून आढळून येते. लंडनच्या डेली टेलिग्राफतर्फे विशेष प्रतिनिधी एलिस बार्टलेट भारतात आल्या होत्या. त्यांनी जिनांची मुलाखत घ्यायची इच्छा प्रदर्शित केली. जीना आनंदाने तयार झाले. आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी बार्टलेटना सांगितले "भारताची एकात्मता टिकणे, हिंदूंच्याच नव्हे तर मुसलमानांच्याही दृष्टिने हिताचे आहे. मी एका प्रातांचा नाही तर संपूर्ण भारताचा प्रतिनिधी आहे. मी भारताचा नागरिक आहे. जरी भिन्न-भिन्न पंथांचे, वंशाचे लोक भारतात राहत असले, त्यांच्या भाषा वेगवेगळया असल्या तरी त्या विविधतेचा एकात्मतेला किंवा स्वराज्य स्थापनेला मुळीच अडथळा होत नाही,

होणार नाही. भारत हे एकावयवी राष्ट्र सामावून घेणारे भौगोलिक एकक नाही, हे तुमचे म्हणणे मला मुळीच मान्य नाही."(१४)

हिंदू आणि मुसलमान हे एकत्र गुण्यागोविंदाने राहू शकतात हे म्हणणे पटवून देण्यासाठी जीनांनी बार्टलेट यांना मग वकिली व्यवसायातला आपला स्वतःचा अनुभव सांगितला. मी गेल्या तीस वर्षाहूनही अधिक काळ वकिली करत आलो आहे. पण एवढया प्रदीर्घ कालावधीत मला एकादेखील मुसलमान अशिलाने अशी तक्रार केलेली ऐकायला मिळाली नाही की, न्यायाधीश हिंदू असल्यामुळे आपल्याला न्याय मिळू शकला नाही. उलट बाजूनेही तीच वस्तुस्थिती आहे. जीनांची ही मुलाखत पुढे काही दिवस इंग्लंडबरोबरच भारतातही चर्चेचा विषय बनून राहिली.

जीनांचा पिंड नेमस्त राजकारणाचा होता. गांधीयुग सुरु झाल्यानंतर सामूहिक आंदोलनाचे शस्त्र पुढे आले. जीनांच्या आयुष्यात येथून कलाटणी मिळाली. १९२० साली खिलाफत चळवळीला उधाण आले होते. प्रथम लीगच्या आणि नंतर काँग्रेसच्या अधिवेशनात असहकार आंदोलनास पाठिंबा देणारे ठराव संमत झाले. लीग अधिवेशनातील आपल्या अध्यक्षीय भाषणात जीनांनी स्वतःचे मनोगत न व्यक्त करता प्रतिनिधींना विचारपूर्वक निर्णय घ्या असा सल्ला दिला. काँग्रेस अधिवेशनात मात्र त्यांनी असहकार आंदोलनास कडाडून विरोध केला. नंतर ते काँग्रेसच्या बाहेर पडले ते कायमचेच.

सन १९२३ साली मृतप्राय झालेल्या लीगचे जिनांनी पुनरुज्जीवन केले त्यामुळे लखनौ कराराला व खिलाफत चळवळीला विरोध करुन नव्या राजकीय सुधारणा राबवणारे मुसलमान पुढारी लीगमध्ये सामील झाले. पण थोडयाच महिन्यांनी कायदेमंडळात एकसारखी अडकवणूक करुन संविधानात्मक पेचप्रसंग उभा करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेल्या स्वराज्य पक्षाशी सहकार्य करण्याचा निर्णय जिनांच्या कायदेमंडळातील स्वतंत्र पक्षाने घेतला. जिना व मोतीलाल नेहरु यांनी मध्यवर्ती कायदेमंडळ गाजविले. अनेकदा सरकारचा पराभव झाला. मोतीलालजींचा राष्ट्रीय मागणीचा ठराव मध्यवर्ती कायदेमंडळात संमत झाला.

परंतु दोन वर्षांच्या आत जीनांनी आपली भूमिका बदलली. स्वराज्य पक्षांशी संबंध तोडून ते सुधारणा राबविण्याची भाषा बोलू लागली. मुसलमानांमध्ये सुधारणा करणे एवढेच अपेक्षित ध्येय जीनांनी धरले.(१५)

जीनांच्या नेतृत्वाखाली पुनरुज्जीवन झालेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात लखनौ करारात एकतर्फी सुधारणा करण्याच्या मागणीसाठी आग्रह धरण्यात आला. या करारान्वये काँग्रेसने स्वतंत्र मतदारसंघ आणि मुसलमान जेथे अल्पसंख्य होते. त्या प्रांतात प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधीत्व मान्य केले होते. बदल्यात पंजाब आणि बंगाल प्रांतातील मुसलमानांना लोकवस्तीच्या प्रमाणात म्हणजे ५० ते ५५ टक्के प्रतिनिधीत्व देण्याऐवजी ४० टक्के दिले तरी चालेल असे लीगने कबूल केले होते. करार दुरुस्त करावयाचा असेल तर संयुक्त मतदारसंघ मान्य करा. मग इतर मुस्लिम मागण्या काँग्रेस मान्य करु शकेल असे काँग्रेस अध्यक्षांनी आवाहन केले होते.(१६)

याच सुमारास नव्या सुधारणा सुचविण्यासाठी ब्रिटीश सरकारने सायमन आयोगाची नेमणूक केली. त्यात सर्व गोरे सदस्य असल्यामुळे देशात संतापाची लाट उसळली. यावेळी जिनांनी पुन्हा एकावर राष्ट्रीय भूमिका घेतली. जिनांनी बोलाविलेल्या मुस्लीम नेत्यांच्या परिषदेने विशिष्ट मुसलमानांच्या मागण्या मान्य केल्या तर संयुक्त मतदारसंघ स्वीकारण्याचे मान्य केले. सायमन आयोगावरील बहिष्काराच्या आवाहनालाही जीनांनी पाठिंबा दिला तेंव्हा या दोन प्रश्नावर मुस्लिम लीग दुभंगली. सायमन आयोगाशी सहकार्य आणि संयुक्त मतदारसंघाला विरोध या मुद्यावर जिना विरोधकांनी वेगळया मुस्लिम लीगची स्थापना केली. या नव्या मुस्लीम लीगने मुस्लिम मागण्यासाठी सर्व पक्षीय मुस्लिम परिषद आयोजित केली. प्रांताप्रांतातून मुस्लिम परिषदा भरल्या व संयुक्त मतदारसंघांना विरोध करण्यात आला.(१७)

काँग्रेस पक्षाने जीनांच्या नव्या भूमिकेचे स्वागत केले. १९२७ च्या डिसेंबरमध्ये काँग्रेस व जीना - लीग यांच्या वेगवेगळया अधिवेशनात एकाच धर्तीचे ठराव संमत झाले. काँग्रेसने यापुढे जाऊन स्वतंत्र हिंदुस्थानची

राज्यघटना तयार करण्यासाठी सर्वपक्षीय परिषद बोलाविली. परंतु जीना-लीगने सर्वपक्षीय अगर तिने नेमलेल्या नेहरु समितीशी सहकार्य केले नाही. १९२८ च्या मध्यास लखनौच्या सर्वपक्षीय परिषदेने नेहरु अहवालाचा पहिला आराखडा मंजूर केला व मोठी समिती नियुक्त केली. परंतु जीनांनी या समितीच्या कामकाजात भाग घेतला नाही. अखेरीस पक्का आराखडा तयार होऊन तो डिसेंबर १९२८ च्या कलकत्ता येथे भरकेल्या सर्वपक्षीय परिषदेपुढे आल्यावर जिनांनी मुस्लिम अल्पसंख्य असतील. त्या प्रांतातल्या मुसलमानांना केंद्र कायदेमंडळात प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधीत्व, अत्यंत कमकुवत केंद्रसत्ता, केंद्रीय कायदेमंडळात मुसलमानांना ३३ टक्के राखीव जागा इत्यादी चौदा मागण्या मांडल्या. शीख, ख्रिस्ती, इ. अल्पसंख्यांकांनी यास विरोध केला. सर्वपक्षीय परिषदेने जिनांची मागणी नाकारली.(१८)

यानंतर चार दिवसांनी दिल्लीला जीना विरोधकांची परिषद भरली होती. या परिषदेत विभक्त मतदारसंघासह अनेक मागण्याचा मसुदा तयार करण्यात आला. दोन महिन्यांनी जिनांनी अशाच प्रकारच्या चौदा मागण्या मांडल्या. यानंतर १९३०-३१ साली गोलमेज परिषद भरली. त्यासाठी जिनांना खास निमंत्रण मिळाले होते. मुस्लीम शिष्टमंडळाचे नेतृत्व आगाखानकडे होते. जिनांनी आगाखानाच्या भूमिकेला संपूर्ण पाठिंबा दिला आणि मुस्लिम मागण्या मान्य झाल्याखेरील मध्यवर्ती सरकारसाठी संघिय संविधान तयार करण्यास विरोध केला. गोलमेज परिषद झाल्यानंतर जिनांनी इंग्लंडमध्येच स्थायिक होण्याचे ठरविले पण पुढील दोन वर्षात अनेक ज्येष्ठ मुस्लिम नेते निधन पावले. उरलेल्या सर्व मुस्लिम नेत्यांनी एकत्र येऊन जिनांनी मुस्लीम लीगचे नेतृत्व करावे असे आवाहन केले. जिनांनी हे त्याचे आमंत्रण स्वीकारले व लीगची धुरा उचलली. त्यानंतर त्यांच्या मृत्यूपर्यंत ते लीगचे सर्वाधिकारी म्हणून टिकून राहिले.(१९)

संघराज्य पध्दतीला विरोध मुस्लीम राजकीय एकजूट आणि प्रांतिक सरकारात मुसलमानांना योग्य व प्रभावी प्रतिनिधीत्व या मुद्यावर त्यांनी १९३७

च्या निवडणूका मुस्लीम पक्षाने लढविल्या जिनांच्या १४ मागण्याच्या जाहीरनाम्याप्रमाणे जेथे मुसलमान अल्पसंख्य असतील त्या प्रांतात त्यांना १/३ प्रतिनिधित्व हवे होते. संयुक्त प्रांतात एकूण ६७ मुसलमान जागांपैकी फक्त २२ जागा जिंकूनही लीगला काँग्रेसने एक तृतीयांश प्रतिनिधीत्व देऊ केले होते. परंतु मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीचे तत्व स्वीकारण्यास लीगने नकार दिल्यामुळे तेथे काँग्रेस-लीगचे संयुक्त मंत्रिमंडळे स्थापन होऊ शकली नाहीत. यानंतर जीनांनी काँग्रेस राज्य म्हणजे हिंदूंचे राज्य अशी प्रक्षोभक घोषणा देऊन काँग्रेसविरुध्द प्रचाराची राळ उठविली. काँग्रेस सरकारची मुसलमानांवर जुलूम-जबरदस्ती चालविण्याचे आरोप एकसारखे सुरु झाले. तडजोडीचे प्रयत्न सुरु झाले, तेंव्हा प्रथम काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे आणि लीग हीच मुसलमानांची एकमेव प्रतिनिधीत्व करते हे मान्य करा, मग बोलणी करु असे जीनांनी उत्तर दिले. यावरुन जीनांचे मुस्लीम लीगविषयी असलेले मत स्पष्ट होते.(२०)

मुस्लीम लीगने १९३८ सालच्या अखेरीस देशाच्या फाळणीची मागणी केली. हिंदुस्थानातील सर्व मुसलमानांसाठी वेगवेगळी राज्ये व मुस्लीम संस्थानिकांना सार्वभौमत्व देणारे अनेक पर्याय पुढे आले. १९३९ साली दुसरे महायुध्द सुरू झाले. दुसऱ्या महायुध्दात जीनांनी ब्रिटीशांना मदत करण्याचे ठरविले आणि आपल्या बाजूने जास्तीत जास्त मुस्लिमांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस हे ब्रिटीशांच्या विरोधात होते म्हणून जीनांनी ब्रिटीशांना जाणीवपूर्वक पाठिंबा देऊन दोन भाग पाडण्यात ते यशस्वी झाले.(२१)

१९४० च्या लाहोर येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनात बॅ. जीना अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "हिंदू राजकीय नेते इस्लाम व हिंदू यांच्यातील खरे स्वरुप समजू शकले नाहीत. हिंदू व मुस्लिमांच्या धार्मिक तत्त्वे, सामाजिक रुढी व साहित्य वेगवेगळे असल्याने ते एकत्र होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांची संकल्पना वेगवेगळया आहेत. जीवनाबद्दलच्या अपेक्षा वेगवेगळया आहेत हे सत्य आहे की हिंदु-मुस्लिमांनी वेगवेगळया ऐतिहासिक उगमातून प्रेरणा घेतलेली

आहे. त्याची महाकाव्ये वेगळी आहेत. हिंदू धर्मातील आदर्श व्यक्ती ही मुस्लिमांसाठी शत्रू आहेत. या दोघांना एकत्र जुंपणे कठीण आहे कारण हिंदुंची संख्या जास्त असून मुस्लिमांची कमी आहे," असे बॅ. जीनांचे मत होते.(२२)

मार्च १९४० मध्ये भरलेल्या लाहोरच्या लीग अधिवेशनात हिंदू राष्ट्रवादाच्या आधारावर फाळणीची मागणी अधिकृतपणे करण्यात आली. पुढील वर्षाच्या मद्रास अधिवेशनात जीनांनी स्वतंत्र द्रविडस्तानच्या मागणीला जाहीर पाठिंबा दिला होता. १९४२ साली क्रिप्स योजना मांडली गेली. या योजनेप्रमाणे कोणत्याही प्रांताला किंवा देशी संस्थानिक फुटून निघण्याचा अधिकार मिळून देशाचे विघटन होण्याचे संकट उभे राहिले. त्याविरुध्द सुरू केलेल्या छोडो भारत आंदोलनाचा जिनांनी धिक्कार करुन मुसलमानांवर हिंदू राज्य लादण्यासाठीच हे आंदोलन सुरु केले असा प्रचार केला. (२३)

फाळणी होणार असेल तर ती जनतेच्या इच्छेने व शांततेच्या वातावरणात व्हावी म्हणून राजाजी योजना मांडण्यात आली. गांधीजींनी ही योजना जीनांच्या पुढे एक पर्याय म्हणून ठेवली होती. परंतु गांधीजींबरोबरच्या वाटाघाटीत राजाजी योजनेत अभिप्रेत असलेले कुरतडलेले पाकिस्तान आपण कदापि पत्करणार नाही असे जिनांनी सांगितल्यामुळे या वाटाघाटी फिस्कटल्या.

१९४५ च्या काँग्रेस, काँग्रेस-लीग सहकार्याची भुलाभाई देसाई व लियाकत अली योजनाही जीनांनी फेटाळली. १९४५ च्या मध्यास भरलेल्या सिमला परिषदेत जीनांनी अवास्तव मागण्या मांडल्यामुळे काँग्रेस, मुस्लिम लीग आणि इतर पक्षाचे हंगामी सरकार स्थापन होऊ शकले नाही.

१९४५ अखेर सार्वत्रिक निवडणूका झाल्या. त्यात सरहद्द प्रांत सोडून इतर सर्वत्र लीगला मुस्लीम मतदाराचा प्रचंड पाठिंबा मिळाला. अखेरच्या वाटाघाटासाठी आलेल्या कॅबिनेट शिष्टमंडळाने राजाजी योजनेतल्यासारखे छोटे पाकिस्तान देऊ केले. ते जीनांनी नाकारले, तेव्हा जीनांना हवे असलेल्या मोठया पाकिस्तानची दोन विभागात वाटणी करुन त्यांना संपूर्ण स्वायत्तता देणारे केंद्र सरकारला फक्त संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि दळणवळण

एवढीच खाती सुपूर्द करणारी पर्यायी योजना कॅबिनेट शिष्टमंडळाने मांडली याच हंगामी सरकारात काँग्रेसला सहा, लीगला पाच व इतरांना तीन जागा देण्यात येतील असे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी सांगितले. कॅबिनेट मिशन योजना जो पक्ष स्वीकारत नाही. त्याला हंगामी सरकारात स्थान असणार नाही हे स्पष्ट केले. काँग्रेसने ही योजना नाकारेल आणि लीगला हंगामी सरकार स्थापन करता येईल अशी जीनांची अटकळ होती. लीग कौन्सिलने या योजनेमार्फत मोठे पाकिस्तान स्थापन करण्याचे स्वप्न साकार होईल असे जाहीर करुन योजना स्वीकारली. त्यावेळच्या भाषणात संविधान होईपर्यंत संस्थाने संघराज्यात सामील होण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही असे जीनांनी स्पष्ट केले. याचवेळी हैदराबाद संस्थानाला सार्वभौमत्व देणारी निजामाची राज्यघटना जिनांनी संमत केली. परंतु काँग्रेस पुढाऱ्यांची विशिष्ट अन्वयार्थासह कॅबिनेट योजना स्वीकारली आणि हंगामी सरकारात काँग्रेसला पाच ऐवजी सहा जागा देण्याचे आश्वासन मिळविल्याने जिनांचे अंदाज कोसळले. नेहरुंच्या भाषणाचे निमित्त करुन त्यांनी कॅबिनेट मिशन स्वीकारण्याचा लीग कौन्सिलचा ठराव रद्द करुन घेतला. अखेरीस २८ जुलै १९४६ रोजी मुंबईत लीगच्या कार्यकारिणीच्या बैठकीत जिनांनी प्रत्यक्ष कृतियोजना मांडली.(२४)

कार्यकारिणीत समोर जमलेल्या लीग कार्यकर्त्यांना उद्देशून जिना म्हणाले, आज आपण एक ऐतिहासिक निर्णय घेतो आहोत. मुस्लीम लीगच्या स्थापनेपासून आपण कायम संविधानिक मार्गाची कास धरीत आलो आहोत, पण आज ब्रिटीश राज्यकर्ते व काँग्रेसचे नेते या दोघांनी आपल्यावर आशी पाळी आणली आहे की, या मार्गाला आता रामराम ठोकणे आपल्याला भाग पडत आहे. आपल्यावर दोन बाजूंनी हल्ला होतो आहे. आपल्या एका प्रतिस्पर्ध्याजवळ सत्ता आणि मशीनगन आहे. दुसरा प्रतिस्पर्धी असहकाराचे व कायदेभंगाचे मन आंदोलन हत्यारासारखे वापरीत आला आहे. अशा स्थितीत आपल्यालाही पिस्तूल बाळगणे भाग आहे, असे भाषण जीनांनी दिले.(२५)

लीगच्या कार्यकारिणीने दोन दिवस चर्चा करुन अखेरीस १६ ऑगस्ट हा प्रत्यक्ष कृतिदिन - डायरेक्ट ॲक्शन डे म्हणून पाळायचा निर्णय घेतला त्या दिवशी लीगच्या नेत्यांनी मुसलमान समाजाला आपली भूमिका समजावून देण्यासाठी देशभर सर्वत्र छोटया मोठया सभा आयोजित कराव्यात असे ठरले. ब्रिटीशांच्या सध्याच्या गुलामगिरीपासून आणि संभाव्य हिंदू वर्चस्वापासून मुक्त होण्यासाठी पाकिस्तान मिळविण्यासाठी लढण्यास सज्ज व्हा! असा संदेश घरोघर पोचविण्याचा इरादा स्पष्ट झाला. जीनांनी राष्ट्रवादी मुसलमानांविरुध्द जहरी प्रचार मोहिम उघडली. मौलाना अबुल कलाम आझाद व अन्य मुस्लिम राष्ट्रवादी नेत्यांची संभावना त्यांनी "कॉंग्रेसमध्ये शोभेचे नेते, इस्लामशी दगाफटका करणारे व हिंदूंचे भाडोत्री प्रतिनिधी" अशा शब्दांत केली. १९४५ ते १९४७ या काळात त्यांना सामाजिक धाक दाखवून क्वचित शारीरिक हल्ल्याची भीती दाखवून धार्मिक कट्टरता पाळण्याचे आव्हान केले. एप्रिल १९४३ मध्ये लीग अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात जीनांनी खान अब्दुल गफार यांचे वर्णन, "हिंदूकरणाच्या प्रभावाचे आणि लढावू पठाणाच्या खच्चीकरणाचे प्रमुख" असे केले होते.(२६)

ऑगस्ट १९४६ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरुंच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन झाले. या हंगामी सरकारात प्रवेश करण्यास लीगने प्रथम नकार दिला व पाकिस्तान मागणीसाठी प्रत्यक्ष कृतीदिन जाहीर केला. बंगालमध्ये भयानक दंगली झाल्या. इंग्रजी सत्ता नाहीशी झाल्यावर लीग कोणत्याही प्रकारे वागणार याची कल्पना या दंगलीमुळे आली. सुमारे पाच हजाराहून जास्त लोक ठार झाले. नोआखली भाग अनन्वित अत्याचार झाले.

मुस्लीम लीगच्या या धमकावण्यांना न भिता २ सप्टेंबर १९४८ रोजी पंडित नेहरु हंगामी सरकाराचे पंतप्रधान झाले. आता आपण हंगामी सरकारात शिरलो नाही तर आपल्या हाती काहीच येणार नाही हे पाहून लीगने हंगामी मंत्रिमंडळात प्रवेश केला. परंतु लीगचा उद्देश एकत्र काम करण्याचा नसून हंगामी सरकार नेस्तनाबूत करण्याचा होता.

साऱ्या भारतभर जातीय दंगली मुद्दाम चालू ठेवण्यात आल्या अशा स्थितीत इंग्रज सरकारने जून १९४८ च्या आत आपण भारत सोडणार असल्याचे केले. त्यामुळे अराजक अथवा फाळणी अशा विचित्र कात्रीत काँग्रेस सापडली. भारत सोडण्याच्या दृष्टिने तयार करण्यासाठी ब्रिटीश सरकारने लॉर्ड वेव्हेल यांच्या जागी लॉर्ड माऊंटबॅटन यांची व्हाइसरॉय म्हणून नियुक्ती केली.(२७)

शेवटी जून १९४७ मध्ये नवे व्हाइसरॉय माऊंटबॅटन यांनी फाळणीची योजना मांडली. त्यात देऊ केलेले, कुरतडलेले पाकिस्तान जीनांनी पत्करले व देशाची फाळणी झाली. पाकिस्तानचे पहिले गर्व्हनर आणि पाकिस्तान संविधान निर्मितीचे अध्यक्ष जीना झाले. प्रथम त्यांनी धर्मातील राज्यघटना निर्माण करण्यावर भर दिला होता. परंतु डिसेंबर १९४७ च्या लीग अधिवेशनात पाकिस्तान हे मुस्लिम राष्ट्र होईल असे त्यांनी जाहीर केले.

पाकिस्तान राष्ट्राचे जनक म्हणून आधुनिक इतिहासात जीनांना महत्त्व प्राप्त झाले. राजकीय जीवनातील विरोधाभास त्याच्यामध्ये जेवढा आढळतो तेवढा इतर कोणत्याही राजकीय नेत्यामध्ये आढळत नाही हे दिसून येते.

# संदर्भसूची


१ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. २.

२ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 5.

३ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ४.

४ पूर्वोक्त... पृ. ११-१२.

५ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 6.

६ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ३६-३७.

७ पूर्वोक्त... पृ. ३९.

८ पूर्वोक्त... पृ. ४०.

९ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 32.

१० ग्रोवर बी. एल्. - आधुनिक भारताचा इतिहास (अनुवादक बेल्हेकर एन्. के.) एस. चंन्द ॲण्ड कंपनी लि., नवी दिल्ली, २००३, पृ. ४९८.

११ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ६२.

१२ पूर्वोक्त... पृ. ६७.

१३ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 42.

१४ Zakaria Rafiq - The Man Who Divided India, Popular Prakashan, Mumbai - 2001, p. 83-84.

१५ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. १५४.

१६ Zakaria Rafiq - The Man Who Divided India, Popular Prakashan, Mumbai - 2001, p. 131-133.

१७ पूर्वोक्त... पृ. १३३.

१८ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 179-180.

१९ पूर्वोक्त... पृ. १८०.

२० पूर्वोक्त... पृ. १८४.

२१ नगरकर वसंत - पाकिस्तानचे जन्मरहस्य : (अनुवाद - लिमये माधव), महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९८८, पृ. २४९.

२२ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. २२३-२२४.

२३ Hodson H. V. - The Great Divided Britain, India, Pakistan (London), 1969, p. 153.

२४ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 189.

२५ हर्डीकर आनंद - कायदेआझम, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ३९९.

२६ पाल बिपिनचंद्र - इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडंस, (अनुवाद एम. व्ही. काळे) के. सागर पब्लिकेशन, पुणे, पृ. ५२०

२७ Wolpert Stanley - Jinnah of Pakistan, Oxford University, Delhi, 1985, p. 330-332.